मारुती म्हसू अडागळे
विरुध्द भिमा रामा उफाडे

**निशाणी क्र. ५खालील आदेश**
**(दिनांक १२ ऑक्टोबर २०१७)**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९, नियम १ व २ नुसार प्रतिवादी व तर्फे इसमांनी दावा मिळकतीमधिल कब्जेवहिवाटीस बेकायेदशिरपणे हरकत अडथळा करु नये यासाठी तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळावा म्हणून दाखल केला आहे.

२ वादीच्या कथनानुसार दावा मिळकत ही त्याच्या मालकीची असून सदर मिळकत त्याला शासनाकडून मिळालेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या जमिनी दावा मिळकतीलगत आहेत. वादीने दिनांक १४.०९.२०१६ रोजी केलेल्या मोजणीनुसार प्रतिवादीने अतिक्रमण केल्याचे आढळून आले. वादीने सदर अतिक्रमण काढून दयावे अशी प्रतिवादींना मागणी केली असता त्यांनी नाकारली. प्रतिवादी वरीलप्रमाणे वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले.

३. प्रतिवादी क्र. १ ने निशाणी २१कडे म्हणणे देवून अर्जातील वादीच्या कथनांचा इन्कार केला. प्रतिवादीच्या कथनानुसार त्याने दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले नाही तसेच हरकत अडथळा केला नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी निशाणी क्र. १९कडे म्हणणे देवून वादीच्या कथनांचा इन्कार केला. प्रतिवादींच्या कथनानुसार वादीने बेकायदेशिरपणे प्रतिवादींच्या मिळकतीमधिल उस तोडला व रस्ता केला आहे. प्रतिवादींचा वादीशी कोणताही संबंध नसताना केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने खोटा अर्ज व दावा दाखल केला असून तो नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

५. वादीतर्फे श्री शिंदे वकील, प्रतिवादी क्र. १ तर्फे श्री सोनवणे वकील तर प्रतिवादी क्र. २ ते ६ तर्फे श्री गायकवाड वकीलांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांची पडताळणी केली. पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे का ? | होकारार्थी |
| २ | वादीच्या हक्कात सोयीचे समतोलक आहे का ? | होकारार्थी |
| ३ | अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे का ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र. १ ते ४करीताः–

६. वादीच्या कथनानुससार प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असून हरकत अडथळा केला. वादीने निशाणी क्र. ३ सोबत दावा मिळकतीचे तसेच प्रतिवादींच्या मिळकतीचे सातबारा उतारे दाखल केले आहेत. वादीला शासनामार्फत दिनांक ०६.११.१९९२ रोजी दावा मिळकत मिळाली होती. वादीप्रमाणेच प्रतिवादींना सुध्दा शासनाकडून मिळकती मिळाल्या आहेत याबाबत वाद नाही. वादीने निशाणी क्र. ३/११ कडे दिनांक १४.०९.२०१६ रोजीचा मोजणी नकाशा दाखल केला आहे त्यावरुन प्रथमदर्शनी प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी २३/२कडे तंटामुक्ती समितीचा दाखला दिला आहे. तसेच कुलमुखत्यारपत्रची प्रत व फोटो दाखल केले आहेत. सदर फोटोसोबत कोणतेही शपथपत्र नसल्यामुळे ते दावा मिळकतीचे आहेत किंवा कसे हे स्पष्ट होत नाही. प्रतिवादींच्या कथनानुसार वादीने केलेली मोजणी चुकीची आहे. वरील कथनांवरुन प्रतिवादी हे वादीस हरकत अडथळा करीत असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

७. प्रस्तुतचा दावा अतिक्रमण काढून मिळावे यासाठी दाखल केला आहे. पुराव्याअंती प्रतिवादींनी अतिक्रमण केले किंवा कसे हे सिध्द होणार आहे परंतू तोपर्यत प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतींमिधिल कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केल्यास त्याचे नुकासान होवू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस, सोयीचे समतोलक असून अर्ज नामंजूर झाल्याचे वादीचे अपरिमित नुकसान संभवते. सबब मी मुद्दे क्र. १ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्या क्र. ४ करीता पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ६ व तर्फे इसमांनी दावा मिळकतीतील वादीच्या कब्जेवहिवाटीस दाव्याचा निकाल लागेपावेतो हरकत अडथळा करण्याचा नाही अशी तुर्तातुर्त मनाई देण्यात येत आहे.

(सुमित वि. जोशी)
सह दिवाणी न्यायाधीश,
कनिष्ठ स्तर , दौंड

दौंड
दिनांक– १२.१०.२०१७

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Smt.S.V. Hirve |
| Court Name | : S.V. Joshi |
| | : Jt. Civil Judge J.D., Daund. |
| Date of Judgment | : 12.10.2017 |
| Judg. signed by P. O. | : 12.10.2017 |
| Uploaded on | : 13.10.2017 |